वतन / इनाम जमिनीचा नजराणा
भरण्यास मुदतवाढ

महसूल व वन विभाग
शासन क्रमांक बिआयडब्ल्यु २००८/प्र.क्र.९४/ल-४
मंत्रालय,मुंबई :- ४०००३२
दिनांक :- 2 ऑगस्ट, 2008

**वाचा :-** महसूल व वन विभागाचे पत्र क्रमांक बिआयडब्ल्यु २०९७/१२७४ प्र.क्र.३००/ल-४,
दिनांक ४/१२/१९९७

**शासन निर्णय :-**

भूतपूर्व इनाम जमिनीच्या हस्तांतरणास परवानगी देताना नजराणा भरुन घेण्याची तरतूद आहे. जिल्हाधिकारी, नाशिक यांना एका विवक्षित प्रकरणांमध्ये उपरोक्त दिनांक ४/१२/१९९७ रोजीच्या पत्रान्वये आदेशांच्या तारेखापासून ३ महिन्यांपर्यंत नजराणा भरण्यास मुदतवाढ द्यावयाची असल्यास शासनाची मंजूरी घेण्यात यावी व अशी मुदतवाढ देताना आदेशांच्या दिनांकापासून नजराणा रक्कम भरेपर्यंत १५ टक्के दरसाल दर शेकडा या दराने व्याज आकारणी करावी अशी ही सूचना या पत्रात करण्यात आलेली आहे.

२. भूतपूर्व इनाम जमीन हस्तांतरण करताना पूर्वपरवानगी घेतल्यास ५० टक्के नजराणा आकारणे अनिवार्य आहे. जिल्हाधिकारी,विभागीय आयुक्त हे अशा हस्तांतरणास परवानगी देताना धारकाने नजराणा म्हणून किती रक्कम भरावी, याबाबत आदेश पारीत करतात. दिनांक ४/१२/१९९७ रोजीच्या विभागाच्या पत्रानुसार आदेशाच्या तारखेपासून नजराणा भरण्यास तीन महिन्यापर्यंत मुदत देण्यास जिल्हाधिका-यांना अधिकार दिलेले आहेत. तीन महिन्यानंतर धारकास नजराणा भरावयाचा असेल तर शासनाची पूर्वपरवानगी घेण्याची तरतूद नियमात अथवा शासन निर्णयात करण्यात आलेली नाही.

३. नजराणा भरण्या संदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर किती मुदतीमध्ये धारकाने नजराणा भरणे आवश्यक आहे ? मुदतीत नजराणा न भरल्यास काय करावे ? ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी

४. याद्वारे शासन आता असे आदेश देत आहे की, नजराणा निश्चित करण्याचे आदेश पारीत केल्याच्या तारखेपासून ते आदेश तीन महिन्यांपर्यंत वैध राहतील. म्हणजे त्या आदेशाच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत संबंधित धारकाने नजराणा शासनाच्या कोषागारात जमा करणे आवश्यक राहील. अन्यथा सदर नजराण्याचे आदेश तीन महिन्यानंतर निष्प्रभावित होतील. सबब तीन महिन्यांच्या मुदतीनंतर धारकाला नजराणा भरावयाचा असेल,तर सक्षम प्राधिका-याने त्याबाबत नव्याने आदेश पारीत करावेत. असे आदेश पारीत करताना नजराणाची रक्कम नव्याने निश्चित करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमाकान्त असमर)
सहसचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व उपजिल्हाधिकारी अधिकारी
४) सर्व तहसिलदार